# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८
### (जाहिरात क्रमांक ३२/२०१८)
## घोषणा

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या **राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८** च्या लेखी परीक्षेचा निकाल शासनाच्या दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार दिनांक १७ डिसेंबर, २०१८ रोजी जाहीर करण्यात आला आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण -१११८/प्र.क्र.३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन शुध्दिपत्रकातील तरतूदीस अनुसरुन ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी खुला समांतर आरक्षित पदासाठी निश्चित केलेल्या अर्हतामानाएवढे किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत, परंतु त्यांच्या सामाजिक वर्गवारीतील समांतर आरक्षित पदांसाठी निश्चित केलेल्या अर्हतामानापेक्षा कमी गुण प्राप्त केले आहेत अशा मुख्य परीक्षेत मुलाखतीकरिता अपात्र ठरलेल्या उमेदवारांचा खुला समांतर आरक्षित पदांवर गुणवत्तेनुसार विचार करून त्यांना मुलाखतीसाठी बोलविण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे. त्यानुसार खुला समांतर आरक्षणाच्या सीमांकन रेषेनुसार दोन उमेदवार मुलाखतीस पात्र ठरत आहेत. सदर दोन उमेदवारांच्या मुलाखती दिनांक **६ फेब्रुवारी, २०१९** रोजी **मुंबई** येथील आयोगाच्या मुख्य कार्यालयात घेण्यात येणार आहेत. **मुलाखतीचा कार्यक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेत स्थळावर स्वतंत्ररित्या प्रसिध्द करण्यात येत आहे.**

२. लेखी परीक्षेद्वारे मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या सर्व उमेदवारांनी प्रस्तुत परीक्षेच्या अधिसूचनेत अधिसूचित केलेल्या पदांसाठी पसंतीक्रम (Preference Number) त्यांच्या प्रोफाईलमध्ये ऑनलाईन पध्दतीने लिंक ओपन झाल्यापासून **तीन** दिवसांच्या आत पाठविणे आवश्यक आहे. केवळ ऑनलाईन पध्दतीने भरलेले पसंतीक्रम विचारात घेण्यात येतील. अन्यथा अधिसूचनेत ज्या क्रमाने पदे नमूद करण्यात आली आहेत, तोच पसंतीक्रम अशा उमेदवारांकरिता गृहित धरला जाईल व तद्नंतर याबाबत उमेदवारांची कोणतीही निवेदने / पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

३. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, लेखी परीक्षेच्या निकालाआधारे मुलाखतीकरिता प्रवेश देण्यात येत आहे. या तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

४. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी, शालेय शिक्षण व क्रीडा

विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार  विषयांकित गट अ व गट-ब पदासाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबतचा संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचा म्हणजेच दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजीचा किंवा तत्पूर्वीचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल व संबंधित क्रीडा प्रमाणपत्र उमेदवारांनी  मुलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य राहील. सदर अहवाल  व क्रीडा प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास खेळाडू आरक्षणाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

५. राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८ चा  निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्दयासंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिध्द करण्यात आला आहे.

मुंबई
दिनांक : .  ३० जानेवारी,  २०१९

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई